# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.07.2024** **वारःशुक्रवार**

---

1. राज्यात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत विक्रमी 71 टक्के क्षेत्रावर पेरणी
2. विधानपरिषदेतील निवृत्त सदस्यांना निरोप
3. राज्यातल्या 27 तालुक्यांसह देशभरात 500 ठिकाणी नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाला सुरुवात आणि
4. विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाची मुंबईमध्ये विजयी मिरवणूक; चाहत्यांकडून जल्लोषात स्वागत

**<u>विधिमंडळ-मुंबई</u>**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत विक्रमी 71 टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत 1 लाख 10 हजार हेक्टरची वाढ झाल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काल विधानसभेत दिली. आतापर्यंत 101 लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या 3 जुलैच्या तुलनेत हे प्रमाण 20 लाख हेक्टरनं वाढलं आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्यात कुठेही खतं आणि बियाणांचा तुटवडा नाही. नियोजनापेक्षा अधिक खतं आणि बियाणं उपलब्ध आहेत, असं ते म्हणाले. खतं आणि बियाणांच्या संदर्भात विविध तक्रारी आल्यानंतर whatsapp हेल्पलाइन सुरू केली आहे; त्यानंतर आतापर्यंत 62 फौजदारी गुन्हे दाखल झाले असून, 278 अधिकारी कर्मचाऱ्यांचं निलंबन केलं आहे. याशिवाय 1 हजारांहून अधिक ठिकाणी विक्री बंद करण्याचे आदेश दिल्याचं कृषीमंत्री म्हणाले.

पुण्यातील ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या परिसरात स्वतंत्र शासकीय कर्करोग रुग्णालय उभारण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

राज्यातल्या दिवाळखोर सहकारी पतसंस्था आणि बँकांनी बुडवलेल्या ठेवीदारांचे किमान एक लाख रुपये परत मिळण्यासाठी स्वतंत्र निधी उभारला जात आहे, अशी माहिती सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी काल विधानसभेत दिली.

राज्यात शासन अनुदानित सुमारे साडे अकरा हजार ग्रंथालयं असून वाचन चळवळीला चालना देण्यासाठी नव्यानं सहा ते सात हजार ग्रंथालयं सुरु केली जातील, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानपरिषदेत सांगितलं. यानुसार 3 हजार लोकसंख्येच्या प्रत्येक गावात तसंच 500 लोकसंख्येच्या आदिवासी बहुल गावात ग्रंथालय अनिवार्य होणार आहे. ग्रंथालयांच्या सध्याच्या अनुदानात वाढ केली जाईल तसंच ग्रंथालयांचा दर्जा वाढवून देण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित करून ग्रंथालयांकडून ऑनलाईन माहिती मागवली जाईल, असं ते म्हणाले.

आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी केलेलं निलंबन तीन दिवसांवर आणण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेनं काल एकमतानं मंजूर केला. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

राज्य पोलीस दलात कंत्राटी पद्धतीनं भरलेली पदं ही तांत्रिक आहेत. ही तात्पुरती भरती 11 महिन्यांसाठी करत असतानाच, दुसरीकडे 81 पदांच्या नियमित भरतीच्या प्रक्रियेला मान्यता दिलेली आहे, उर्वरित पदांच्या भरतीची प्रक्रियाही सुरू आहे, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतली घरं विकण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीनं दिलं जाणार असून अर्ज केल्यानंतर 45 दिवसांत प्रमाणपत्र मिळेल, असं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितलं. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतली घरं विकण्यासाठीच्या अनेक अटी शिथिल केल्या असल्याची माहिती त्यांनी दिली.

**सभासद-निवृत्त**

राज्याच्या वरिष्ठ सभागृहाचा नावलौकिक उंचावणारी कामगिरी निवृत्त होणाऱ्या सदस्यांनी केली आहे. येणाऱ्या पिढ्यांना त्यांच्या कामगिरीतून प्रेरणा घेता येईल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानपरिषदेत काढले. विधान परिषदेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांना काल निरोप देण्यात आला, त्यावेळी शिंदे बोलत होते. विधानपरिषदेतल्या विलास पोतनीस, निरंजन डावखरे, किशोर दराडे, कपिल पाटील, ॲड. अनिल परब, महादेव जानकर, डॉ. मनिषा कायंदे, विजय ऊर्फ भाई गिरकर, बाबाजानी दुर्राणी, निलय नाईक, रमेश पाटील, रामराव पाटील, डॉ. मिर्झा वजाहत, डॉ. प्रज्ञा सातव, जयंत पाटील या सदस्यांना काल निरोप देण्यात आला.

**संपूर्णता**

नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाला देशभरात सुरुवात झाली आहे. येत्या 30 सप्टेंबरपर्यंत देशातल्या 500 तालुक्यात हे अभियान राबवलं जाणार आहे. राज्यातल्या अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमधल्या, 27 तालुक्यांचा या अभियानात समावेश झाला आहे. संपूर्णता अभियानामध्ये गर्भवती महिलांची प्रसुतीपूर्व काळजी आणि त्यांना पोषक आहार, मधुमेह आणि उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींची तपासणी आणि उपचार, माती परीक्षण आणि बचतगटांना मिळणारा फिरता निधी, शाळेतील विद्यार्थ्यांचा संक्रमण दर, तसंच 10 वी आणि 12 वीमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी यावर प्राधान्यानं भर दिला जाणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यात झरी जामणी इथं संपूर्णता अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाअंतर्गत असणाऱ्या शिक्षण, आरोग्य, कृषी, उमेद, पशुसंवर्धन इत्यादी विभागांच्या दर्शकांच्या प्रगतीचा आढावा घेतला. धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातही काल संपूर्णता अभियानचा प्रारंभ झाला. जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यावेळी उपस्थित होते. हिंगोली जिल्ह्यातही कालपासून संपूर्णता अभियानाला प्रारंभ झाला. हिंगोली तालुक्यात अभियानातले सर्व निकष मुदती अगोदर पूर्ण करणार असल्याचा निर्धार जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी यावेळी व्यक्त केला. ते म्हणाले --------

**पालखी**

संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचं काल जेजुरीमध्ये आगमन झालं. टाळ मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात नागरिकांनी पालखीचं स्वागत केलं. संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचा मुक्काम काल जेजुरीमध्ये तर संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम काल वरवंड इथं होता.

**पालखीमार्ग, तळ-स्वच्छता**

दरम्यान दोन्ही पालख्यांचं, पालखी तळावरुन प्रस्थान होताच लगेच दुसऱ्या दिवशी तळांच्या स्वच्छतेच्या कामाला गतीनं सुरुवात होऊन सर्वत्र पूर्ण स्वच्छता केली जात असल्याबद्दल पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी यंत्रणेचं अभिनंदन केलं आहे. संपूर्ण वारी निर्मल करण्यासाठी असेच प्रयत्न करावेत, असं आवाहनही पुलकुंडवार यांनी केलं आहे. दोन्ही पालखी मार्गावर प्रत्येकी शंभर स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

**म्हशी-अपघात-सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातल्या गुळवंची तालुक्यात विजेचा झटका बसून सुमारे 24 म्हशींचा मृत्यू झाला आहे. या म्हशी ज्या ओढ्यात उतरल्या होत्या, त्या ओढ्यामध्ये विजेची तार तुटून पडल्यानं पाण्यात विद्युतप्रवाह उतरला आणि हा अपघात घडला. वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून तातडीनं नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे.

**ऑलिंपिक-नाशिक**

नाशिक जिल्ह्यातल्या देवगाव इथल्या सर्वेश कुशारे याची पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत उंच उडीसाठी निवड झाली आहे. हरयाणातल्या पंचकुला इथं झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सर्वेशनं 2 पूर्णांक 25 मीटर उंच उडी मारत ऑलिम्पिकची पात्रता फेरी गाठली आहे. सर्वेश भारतीय लष्करात सेवेत असून याआधी सर्वेशनं आशियाई स्पर्धांमध्ये पदकं मिळवली आहेत. मात्र ऑलिंपिकच्या उंच उडी क्रीडा प्रकारासाठी निवड होणारा सर्वेश हा राज्यातला पहिला खेळाडू आहे.

**क्रिकेट**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून बार्बाडोसहून मायदेशी परतलेल्या भारतीय संघाची काल मुंबईत लाखो क्रिकेटप्रेमींच्या साक्षीनं अत्यंत जल्लोषात विजयी मिरवणूक काढण्यात आली. मरीन ड्राईव्हपासून वानखेडे स्टेडीयमपर्यंत खुल्या बसमधून निघालेल्या या मिरवणुकीच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा जमलेले चाहते हातात तिरंगा घेऊन, आणि आपल्या लाडक्या खेळाडूंच्या नावाच्या घोषणा देत त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करत होते. तत्पूर्वी काल सकाळी दिल्लीत भारतीय संघानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी पंतप्रधानांनी क्रिकेट संघाला शाबासकी दिली. नवी दिल्ली विमानतळावरही विश्वविजेत्या संघाचं स्वागत करण्यासाठी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

**पाऊस-कोल्हापूर**

कोल्हापूरमधल्या राधानगरी धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु आहे. पंचगंगा नदीवरील 24 बंधारे पाण्याखाली आहेत. अनेक ठिकाणी बंधाऱ्यांवरील पाणी रस्त्यावर आल्यामुळे, वाहतूक अन्यत्र वळवण्यात आली आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातही काही ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार